महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३
Email ID- trti.mah@nic.in
Website-www.trti.maharashtra.gov.in

दिनांक : १९ /०५/२०२२

# सूचना

**विषय :- "स्वयम" प्रकल्पांतर्गत झालेल्या कामांचे मुल्यामापन अभ्यास करणेबाबत...**

राज्यातील अनुसूचित क्षेत्रामधील कुटुंबांची संतुलित आहाराची गरज लक्षात घेऊन, त्या भागात कुक्कुटपालन व पशुसंवर्धन विषयक इतर योजना राबविणे तसेच, स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि त्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वसमावेशक एकात्मिक योजना राबविण्यासाठी राज्यातील आदिवासी कुटुंबांना कुक्कुट पालनाव्दारे रोजगार उपलब्ध होऊन अंगणवाड्यांमधून पूरक आहाराव्दारे अंडी पुरविण्याबाबत कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या शासन निर्णय क्र. कुक्कुट-२०१७प्र.क्र.२७१/पदम-४, दिनांकः २९ एप्रिल २०१७ अन्वये शासनाने सन २०१७-१८ ते २०१९-२० वर्षाच्या कालावधीत **"स्वयम प्रकल्प"** राबविण्यासाठी मान्यता देण्यात आली. सदर **"स्वयम प्रकल्प"** आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील एकूण १६ जिल्ह्यांमध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिक, अहमदनगर, नंदुरबार, जळगाव, धुळे, अमरावती यवतमाळ, नागपूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर व नांदेड या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**सदर "स्वयम" प्रकल्पाच्या मूल्यमापन अभ्यासासाठी नियोजन विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील गट-१ प्रकार-१ (Category A१) : वाणिज्यिक संस्था नामिकासूची (Empanelment) मध्ये असणाऱ्या बाह्यस्थ संस्थांकडून मूल्यमापन प्रस्ताव मागविण्यात येत आहे.**

त्यानुसार नियोजन विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील गट-१ प्रकार-१ (Category A१) : वाणिज्यिक संस्था नामिकासूची (Empanelment) मध्ये असणाऱ्या इच्छुक बाह्यस्थ संस्थांकडून संस्थेकडील उपलब्ध मनुष्यबळ, आवश्यक साधन सामुग्री, मूल्यमापनासाठी लागणारा एकत्रित निधी व मूल्यमापनासाठी लागणारा कालावधी इ. तपशिलासह परिपूर्ण मूल्यमापन प्रस्ताव **दि. २६/०५/२०२२ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत trti.mah@nic.in व dydir1.trti@gmail.com या ई-मेल वर सादर करावा.**

**दि. २६/०५/२०२२ रोजी सांय. ५.०० वा. नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा या मूल्यमापन अभ्यासासाठी विचार केला जाणार नाही.**

निवड झालेल्या संस्थेस आवश्यक त्या सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

**टीप :- संस्था निवडण्याचा अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.**

१. सदर प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी साध्या याद्दच्छिक (Random Sampling) पध्दतीने पुढीलप्रमाणे नमुना निवड अपेक्षित आहे.

| अ. क्र. | जिल्हा | एकूण एकात्मिक बाल विकास प्रकल्प/मदर युनिटची संख्या | निवडण्यात आलेल्या एकात्मिक बाल विकास प्रकल्पातील एकूण अंगणवाड्यांची संख्या | मूल्यमापनासाठी निवडण्यात आलेली नमुना निवड | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकात्मिक बाल विकास प्रकल्प/मदर युनिटची संख्या | अंगणवाड्यांची संख्या | लाभार्थ्यांची संख्या (प्रति मदर युनिट ४१७ लाभार्थ्यांमधून १० % लाभार्थ्यांची निवड) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | अहमदनगर | २ | २३१ | १ | २३ | ४२ |
| २ | अमरावती | २ | २२९ | १ | २३ | ४२ |
| ३ | चंद्रपूर | ११ | २४६ | २ | २५ | ८४ |
| ४ | धुळे | ३ | २५१ | १ | २५ | ४२ |
| ५ | गडचिरोली | १२ | ३८८ | २ | ३९ | ८४ |
| ६ | गोंदिया | ३ | १९३ | १ | १९ | ४२ |
| ७ | जळगांव | ३ | ४२ | १ | ५ | ४२ |
| ८ | नागपूर | १ | १२५ | १ | १३ | ४२ |
| ९ | नांदेड | २ | २५९ | १ | २६ | ४२ |
| १० | नंदुरबार | १२ | ३९५ | २ | ३९ | ८४ |
| ११ | नाशिक | १४ | ४०६ | २ | ४१ | ८४ |
| १२ | पुणे | ४ | १४८ | १ | १५ | ४२ |
| १३ | रायगड | २ | ८७ | १ | ९ | ४२ |
| १४ | पालघर | १२ | ६८३ | २ | ६९ | ८४ |
| १५ | ठाणे | ६ | ४४३ | २ | ४५ | ८४ |
| १६ | यवतमाळ | ११ | २१६ | २ | २२ | ८४ |
| **एकूण** | | **१००** | **४३४२** | **२३** | **४३८** | **९६६** |

२. सदर प्रकल्पाच्या मूल्यमापन अभ्यासासाठी खालीलप्रमाणे प्रपत्रे भरून घेण्यात यावी.

| अ.क्र. | प्रपत्र | बाब | एकूण |
|---|---|---|---|
| १ | प्रपत्र-१ | पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय | ०१ |
| २ | प्रपत्र-२ | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | २४ |
| ३ | प्रपत्र-३ | जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय | १६ |
| ४ | प्रपत्र-४ | एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय | २३ |
| ५ | प्रपत्र-५ | अंगणवाड्या | ४३८ |
| ६ | प्रपत्र-६ | मदर युनिट | २३ |
| ७ | प्रपत्र-७ | लाभार्थी | ९६६ |
| **एकूण भरायचे प्रपत्रे** | | | **१४९२** |

**मूल्यमापन प्रस्ताव सादर करावयाचा अंतिम दिनांक : २६/०५/२०२२**
**वार : गुरुवार वेळ : सायं. ५.०० वा. पर्यंत**
**स्थळ : आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८ क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे ४११००१**
**ई मेल - trti.mah@nic.in व dydir1.trti@gmail.com**

**(हंसध्वज सोनवणे)**
**उपसंचालक**